# 'अबधा'चा गाजा 'बाजा'


» कुणाल चौधरी,
कॉलेज क्लब रिपोर्टर
muntainbox@gmail.com


खडकाळ आणि अवघड चढणीचे रस्ते...त्यावरुन वेगानं गाडी पळवत शर्यत जिंकण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या बाजा कार्स तुम्ही टीव्हीवर बऱ्याचदा पाहिल्या असतील. अशीच एक भन्नाट बाजा कार वांद्र्याच्या फादर कॉन्सिसाओ रॉड्रिग्ज कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांनी तयार केली आहे. इंदूरमध्ये झालेल्या 'बाजा एसएइ २०१६' या स्पर्धेत या कारनं देशभरातून आलेल्या १५० कार्समधून पहिल्या २० कार्समध्ये स्थान पटकावलं. तसंच कारच्या क्षमतेची सर्वांगीण तपासणी करणाऱ्या डायनॅमिक्स इव्हेंटमध्ये या कारनं मुंबईतल्या एकूण कॉलेजांमधून दुसरा क्रमांक पटकावला.

रॉड्रिग्ज कॉलेज ऑफ इंजिनीअरींगच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीनं 'अबधा' ही बाजा कार बनवली आहे. रेसिंग कारपेक्षा पूर्णपणे वेगळ्या धाटणीची असलेली ही बाजा कार विद्यार्थ्यांना आकर्षित करत आहेत. इंदूरच्या बाजा एसएइ २०१६ स्पर्धेत देशभरातून आलेल्या १५० हून जास्त गाड्या सहभागी झाल्या होत्या. 'अबधा' कारनं या स्पर्धेत एन्ड्यूरन्स इव्हेंटमध्ये सलग ४ तास सर्व आव्हानांना तोंड देत पहिल्या २० कार्समध्ये जागा पटकावली.

'अबधा' कार तयार करण्यासाठी ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स कम्प्युटर अशा सर्व विभागाच्या एकूण २५ विद्यार्थ्यांनी काम केलंय. डिझायनिंग, प्लॅनिंग आणि प्रोग्रामिंगवर त्यांनी कामं केलंय. 'यामध्ये कारची सुरक्षा तसंच चालकाच्या सुरक्षेकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. यासाठी कॉलेज तसंच प्रायोजकांचं सहाय्य मिळालं आहे', अशी माहिती टीमचा कॅप्टन नचिकेत मोरे याने दिली. जानेवारी २०१७ मध्ये जमशेदपूरमध्ये होणाऱ्या एन.आई.टी. येथील 'बाजा स्टुडंट्स इंडिया' स्पर्धेत अबधा कार सहभागी होणार आहे. या स्पर्धेत ठसा उमटवल्यानंतर दक्षिण आफ्रिका, कोरिया, अमेरिका येथे होणाऱ्या 'बाजा इंटरनॅशनल' स्पर्धेत दाखल होण्यासाठीही त्यांची टीम प्रयत्न करत आहे. कॉलेजच्या प्रिन्सिपल श्रीजा उन्नीकृष्णन म्हणतात, की 'अबधा टीमचे प्रयत्न कौतुकास्पद आहेत. त्यांना कॉलेज पुरेपूर सहकार्य करतंय. इतर विद्यार्थ्यांनासुद्धा कारबाबत माहिती देण्यासाठी कॉलेजमध्ये वर्कशॉप आणि व्याख्यान ठेवत असतो.'





**कारची वैशिष्ट्यं**

कारचं वजन
**२२२ किलो**
कारचा वेग
**ताशी ६० किलोमीटर्स**
कारसाठी आलेला खर्च
**साडेपाच लाख रुपये**